# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 14 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- राज्यात १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर
- महानगरपालिका निवडणुकांसाठीचा प्रचार थांबला–उद्या मतदान
- आज सर्वत्र मकरसंक्रांतीचा उत्साह, पतंगासाठी नायलॉन मांजा न वापरण्याचं पोलिसांचं आवाहन
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ३२ वा नामविस्तार दिन

आणि

- भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला दिल्लीत सुरुवात

****

१२ जिल्हापरिषदा तसंच १२५ पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम काल जाहीर झाला. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत ही घोषणा केली. या निवडणुकीत येत्या पाच फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, सात फेब्रुवारीला मतमोजणी होईल. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूरसह राज्यातल्या पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि या जिल्ह्यातल्या पंचायत समितींसाठी या निवडणुका होणार असल्याचं, वाघमारे यांनी सांगितलं. या निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर करताना ते म्हणाले...

**बाईट– राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे**

नामनिर्देशन प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबवली जाणार असून, मतदान प्रक्रिया इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांवर घेतली जाणार आहे. मतदारांना जिल्हा परिषदेसाठी एक आणि पंचायत समितीसाठी एक अशी प्रत्येकी दोन मतं द्यायची आहेत.

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकांसाठीचा प्रचार काल थांबला. २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या दोन हजार ८६९ नगरसेवकपदांसाठी उद्या सकाळी साडेसात ते साडेपाच या वेळेत मतदान होणार आहे.

दरम्यान, काल प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं सगळ्या राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केलं. विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, लातूर आणि नांदेड महापालिका क्षेत्रात सर्वच पक्षाच्या तसंच अपक्ष उमेदवारांनी आपल्या प्रचार यंत्रणा पणाला लावल्याचं दिसून आलं.

**

छत्रपती संभाजीनगर इथं संवेदनशील तसंच अतिसंवेदनशील मतदान केंद्रांसह ५३७ मतदान केंद्रांमध्ये वेब कास्टिंग कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या सर्व ठिकाणांवर स्मार्ट सिटी कार्यालयातून नजर ठेवण्यात येणार आहे. मतदान केंद्राधिकारी तसंच कर्मचाऱ्यांना आज साहित्य वाटप होऊन, त्यांना केंद्रांवर रवाना केलं जाईल.

शहरात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांच्या वतीनं काल पथसंचलन करण्यात आलं. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस दल सतर्क असून, नागरिकांनी निर्भयपणे मतदान करावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केलं आहे.

**

परभणी इथं निवडणूक निरीक्षक रत्नदीप गायकवाड यांनी काल शहरातल्या मतदान केंद्रांना भेटी देऊन सुविधांचा आढावा घेतला. तपासणी नाक्यांवर सुरू असलेल्या कामकाजाचीही त्यांनी माहिती घेऊन आवश्यक सूचना केल्या.

****

खाद्यपदार्थ तसंच इतर वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या ई–कॉमर्स कंपन्यांनी, दहा मिनिटांत वस्तू पोहोचवण्याची सेवा बंद करण्यावर सहमती दर्शवली आहे. गिग वर्कर्स म्हणजे या सेवा कंपन्यांसाठी काम करणाऱ्या अस्थायी कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि कामासाठी योग्य वातावरणाची निर्मिती, या उद्देशाने सरकारने या कंपन्यांना

टेन मिनिट्स डिलिवरी सेवा बंद करण्यासंदर्भात सूचना केली. ब्लिंकीट या कंपनीने यावर तत्काळ अंमलबजावणी केल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रित्यर्थ देशभरात सध्या उत्सव साजरा केला जात आहे. महाराष्ट्रात आज मकरसंक्रांत सण साजरा होत आहे. आज तीळगुळाचं वाटप करून परस्परांना शुभेच्छा दिल्या जातात.

पंजाब तसंच हरियाणात शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहडीचा सण साजरा केला जातो तर दक्षिण भारतात अंगणात मांडलेल्या चुलींवर पोंगल म्हणजे खीर शिजवून सूर्याला अर्पण केली जाते. गुजरातसह अनेक भागात पतंग उडवून उत्तरायण साजरं केलं जातं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना या सणांच्या शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक असलेले हे सण, राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

**

दरम्यान, पतंग उडवतांना नायलॉन मांजा वापरू नये, असं आवाहन छत्रपती संभाजीनगरचे पोलिस आयुक्त प्रवीण पवार यांनी केलं आहे. ते म्हणाले..

**बाईट – पोलिस आयुक्त प्रवीण पवार**

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन आज साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठ परिसरात ज्येष्ठ कवी प्रा.फ.मु.शिंदे यांच्या व्याख्यानासह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. विद्यापीठाकडे जाणारे काही मार्ग आज सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद असतील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

भटक्या प्राण्यांच्या संदर्भात गेल्या पाच वर्षात दिलेल्या मार्गदर्शन सूचनांची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. काल यासंदर्भात झालेल्या सुनावणीत न्यायालयाने, भटक्या कुत्र्यांनी चावे घेतल्यास, नुकसान भरपाईची जबाबदारी राज्य सरकारची असेल, असं नमूद केलं. भटक्या

कुत्र्यांना खाद्य देणारे लोक, अशा प्रकरणांसाठी जबाबदार धरले जातील, असं न्यायालयानं म्हटलं आहे. गेल्या वर्षी जुलै महिन्यापासून न्यायालय या मुद्द्यावर स्वत: सुनावणी घेत आहे.

****

बीड जिल्ह्यातल्या गेवराई तालुक्यातल्या रामपुरी इथल्या सहा वर्षांच्या मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीला वीस वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बीडच्या सत्र न्यायालयानं काल हा निकाल दिला. सुंदर तातेड असं या आरोपीचं नाव असून, त्याला तुरुंगवासासह दहा हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे.

****

लातूर इथल्या जवाहर नवोदय विद्यालयातल्या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणी दोन कर्मचाऱ्यांविरोधात अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याशिवाय विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना समाज कल्याण विभागाकडून चार लाख रुपये सहाय्य मंजूर करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

****

महिलांना रजोनिवृत्तीच्या काळात शास्त्रीय उपचार मिळावेत, या उद्देशाने आरोग्य विभागामार्फत विशेष 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात येत आहे. जिल्हा सरकारी रुग्णालयं, उपजिल्हा रुग्णालय, महापालिका रुग्णालयं तसंच निवडक ग्रामीण रुग्णालयांमध्ये आजपासून कार्यान्वित होणाऱ्या या केंद्रात दर बुधवारी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. यामुळे गावातली विकासाची कामं गावातल्या नागरिकांना मिळणार असून, वाढीव कामाच्या दिवसांसाठी धाराशिव जिल्ह्यातल्या उपळे माकडाचे गावचे लाभार्थी केशव चंद्रकांत गुरव यांनी शासनाचे आभार मानले. ते म्हणाले –

**बाईट – केशव चंद्रकांत गुरव**

****

बीड जिल्हा विकास समन्वय आणि सनियंत्रण – दिशा समितीची बैठक काल खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत पार पडली. केंद्र शासनाच्या योजना

जिल्ह्यात राबवताना सर्व यंत्रणांनी समन्वय राखणं आवश्यक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगर इथं येत्या १६ ते १९ जानेवारी दरम्यान शार्ङ्गदेव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. महात्मा गांधी अभिमत विद्यापीठातल्या महागामी संस्थेच्या प्रमुख पार्वती दत्ता यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. चारही दिवस कलाविष्कार, चर्चासत्र, शोधनिबंध सादरीकरण, आणि कार्यशाळा अशा चार मुख्य टप्प्यात होणाऱ्या या महोत्सवात यंदा आळंदी इथले वारकरी परंपरेचे प्रतिनिधी अवधूत गांधी, ज्येष्ठ गायिका अश्विनी भिडे देशपांडे, पद्मश्री नर्तकी नटराज, यांच्यासह पार्वती दत्ता यांचे शिष्यगण विविध कलांचं सादरीकरण करणार आहेत.

****

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला कालपासून दिल्लीत प्रारंभ झाला. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने आयुष शेट्टीला तर दुहेरीत एम आर अर्जुन आणि हरिहरन जोडीने मलेशियाच्या जोडीला पराभूत केलं. चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी जोडीला पुढच्या फेरीत प्रवेश मिळाला. महिलांच्या गटात गायत्री गोपिचंद आणि त्रिशा जॉली जोडीने थायलंडच्या जोडीचा पराभव करून पुढची फेरी गाठली. पी व्ही सिंधू, मालविका बनसोड तसंच किदंबी श्रीकांतसह अनेक खेळाडू आज कोर्टवर उतरणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****